राज्य शासकीय कार्यालयातील गट-क मधील लिपिकवर्गीय पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२०/६२/प्र.क्र.३०/का.१३-अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ नोव्हेंबर, २०२२.

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: मलोआ ११२०/प्र.क्र.१५३/का-८, दिनांक २ डिसेंबर, २०२१.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक:४ मे , २०२२.

**प्रस्तावना :-**

मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालये यामधील गट-क मधील लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा पदभरती जिल्हा/प्रादेशिक/राज्यस्तरीय निवडसमित्यांच्या माध्यमातून करण्यात येते. सदर पदभरतीच्या कार्यपद्धतीबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन क्र.२ येथील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ , दिनांक ४ मे , २०२२ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) सरळसेवेने भरावयाची गट-क मधील लिपिकवर्गीय संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. राज्य शासकीय कार्यालयातील गट-क मधील लिपिकवर्गीय संवर्गातील सर्व पदे यापुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रस्तुत शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती सर्व लिपिकवर्गीय पदभरतीसाठी लागू राहील. तथापि, यापैकी प्रथम टप्प्यात लिपिक-टंकलेखकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करुन बृहन्मुंबई व बृहन्मुंबईबाहेरील लिपिक-टंकलेखक पदभरतीसाठी कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

**(अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविणे :-**

(१) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे नियुक्ती प्राधिकारीनिहाय गट-क मधील सरळसेवेने भरावयाच्या लिपिक-टंकलेखक पदांचे

मागणीपत्र क्षेत्रिय कार्यालयाकडून मागवावे. जेथे बृहन्मुंबई व बृहन्मुंबईबाहेरील कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदाचे नियुक्ती प्राधिकारी एकच असतील, तेथे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने बृहन्मुंबई व बृहन्मुंबईबाहेरील कार्यालयासाठी स्वतंत्र मागणीपत्र मागवावे.

(२) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी विहित नमुन्यामध्ये विहित कालावधीत नियुक्ती प्राधिकारीनिहाय मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यासाठी मंत्रालय प्रशासकीय विभागस्तरावर सह/उप सचिव यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

(३) वरील (अ)(१) प्रमाणे प्राप्त झालेली सर्व मागणीपत्रे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने नियुक्ती प्राधिकारीनिहाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावीत. बृहन्मुंबई व बृहन्मुंबईबाहेरील पदांची मागणीपत्रे नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र पाठवावयाची आहेत. तसेच नियुक्ती प्राधिकारी एकच असल्यास, बृहन्मुंबई व बृहन्मुंबईबाहेरील कार्यालयांची मागणीपत्रेही स्वतंत्रपणे पाठवावीत. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रचलित शासन निर्णयानुसार व कार्यपध्दतीनुसार आरक्षण निश्चित करुन, मागणीपत्र प्रमाणित करुन मंत्रालयीन प्रशासकीय विभागास पाठवावे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविताना एक प्रत सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १३- अ यांचेकडे अग्रेषित करावी.

(४) शासन सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेच्या पदांचे मागणीपत्र आयोगाकडे पाठविण्याच्या कार्यवाहीची प्रमाणित कार्यपद्धती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: मलोआ ११२०/प्र.क्र.१५३/का-८, दिनांक २ डिसेंबर, २०२१ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार अथवा तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या नमुना/कार्यपध्दतीनुसार मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावे.

(५) बृहन्मुंबईबाहेरील पदांसाठी मुद्दा क्रमांक (अ) (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय, दिनांक २ डिसेंबर, २०२१ नुसार मागणीपत्र पाठविताना, मागणीपत्रातील अ.क्र.३ या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार पाठवावे. उर्वरित माहिती शासन निर्णय, दिनांक २ डिसेंबर, २०२१ मधील मागणीपत्रानुसार पाठवावी.

तसेच बृहन्मुंबईतील व बृहन्मुंबईबाहेरील पदांचे मागणीपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन पाठवावे.

(६) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) मधील लिपिक-टंकलेखक पदांचे मागणीपत्र सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १४-अ मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावे.

(७) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) वगळून बृहन्मुंबईतील इतर शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदांची मागणीपत्रे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी नियुक्ती प्राधिकारीनिहाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावीत.

(८) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदांच्या मागणीपत्राबाबत आयोगाने त्यांच्या स्तरावर कार्यवाही करावी व त्याची १ प्रत सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १४-अ कडे अग्रेषित करावी.

(ब) **<u>महाराष्ट्र लोकसेवा आयोग व मंत्रालयीन प्रशासकीय विभागस्तरावरील कार्यवाही</u> :-**

(१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लिपिक-टंकलेखक पदांकरीता स्पर्धा परीक्षा घेण्यात येईल.

(२) जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना उमेदवारांकडून नियुक्ती प्राधिकारीनिहाय पसंतीक्रम घेण्यात येईल.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे उमेदवारांची शिफारस यादी उमेदवारांच्या पसंतीक्रमानुसार नियुक्ती प्राधिकारीनिहाय प्रसिध्द करण्यात येईल.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची शिफारस यादी नियुक्ती प्राधिकारीनिहाय संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात येईल.

(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची (खुद्द) उमेदवारांची शिफारस यादी सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन १४-अ कडे पाठवावी. सदर यादीच्या आधारे सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन१४-अ यांनी मंत्रालयातील विविध प्रशासकीय विभागात उमेदवारांचे नियत वाटप करावे.

(६) महाराष्ट्र लोकसेवा आयोग नियुक्ती प्राधिकारी असलेल्या बाबतीत, उमेदवारांच्याशिफारस यादीनुसार आयोगाच्या आस्थापनेवर उमेदवारांचे नियत वाटप महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने करावे.

(७) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे वरील (ब) (४) नुसार नियुक्ती प्राधिकारीनिहाय प्राप्त झालेली उमेदवारांची शिफारस यादी संबंधित विभागांनी नियुक्ती प्राधिकारीनिहाय पाठवावी. सदर यादीच्या आधारे संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रचलित धोरणानुसार उमेदवारांचे नियत वाटप करावे.

(८) उमेदवारांचे नियत वाटप झाल्यानंतर संबंधित कार्यालयातील नियुक्ती प्राधिकाऱ्याने शिफारसप्राप्त उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी (अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे व अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे) करून उमेदवारांना रुजू करुन घेण्याची कार्यवाही करावी.

२. दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील लिपिकवर्गीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणली असली तरी, सदर पदांना जे आरक्षण यापूर्वी लागू होते त्यानुसारच सदर पदांना आरक्षण व अनुषंगिक सोयी-सवलती यापुढेही लागू राहतील.

३. पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविताना अनुकंपा भरतीसंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार रिक्त पदांची गणना करावी. अनुकंपा तत्वावरील पदभरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर राहील.

४. बृहन्मुंबईबाहेरील लिपिक-टंकलेखकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) विनियम, १९६५ च्या नियम ३ सोबतच्या अनुसूचीमधील अनुक्रमांक ३३ मध्ये आवश्यक दुरुस्ती व सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करणेबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापूर्वी जिल्हा/प्रादेशिक/राज्यस्तरीय निवड समित्यांमार्फत लिपिकवर्गीय पदभरतीकरीता जाहिरात प्रसिध्द होऊन भरतीची प्रक्रिया सुरु झाली असेल तर ती प्रक्रिया सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४ मे, २०२२ नुसार किंवा या संदर्भात शासनाच्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार पूर्ण करण्यात यावी.

६. दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट-क मधील लिपिकवर्गीय संवर्गातील सर्व पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लिपिकवर्गीय संवर्गातील लिपिक-टंकलेखक वगळून उर्वरित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) विनियम, १९६५ च्या नियम ३ सोबतच्या अनुसूचीमधील अनुक्रमांक ३३ मध्ये आवश्यक दुरुस्ती व सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सुरु करावी. तोपर्यंत, लिपिकवर्गीय संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदे वगळून उर्वरित पदांची भरती प्रक्रिया सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक ४ मे,२०२२ नुसार किंवा या संदर्भात शासनाच्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार करण्याची मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना मुभा राहील.

७. भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित) , गट-क मधील लिपिकवर्गीय संवर्गातील पदे वगळून उर्वरित पदे व गट- ड संवर्गातील सरळसेवा पदभरती प्रक्रिया सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक ४ मे,२०२२ नुसार किंवा या संदर्भात शासनाच्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२२११०२१५४१३०४३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT
SAJANIKAR

Digitally signed by PRASHANT SAJANIKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=471c7cbe63d119adc5855a3c23ed95de986c1c7bc41d6f6cdd3767b3ebe74c82, pseudonym=19939F8B3C9B8C6C56014628463D708305EA65C7, serialNumber=217003E42C820EC29C89162937F98929453CC6295B34F71EA285041053A66AA7, cn=PRASHANT SAJANIKAR
Date: 2022.11.02 15:52:42 +05'30'

**(प्रशांत साजणीकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

३) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
४) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६) सर्व मा.संसद सदस्य, मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
८) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)- त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.
१०) *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१४) * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१६) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१७) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१८) *सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१९) *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
२०) *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
२१) *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र/नागपूर,
२२) *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र/नागपूर,
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती),
२४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१०प्रती),
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२७) मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२८) सर्व जिल्हाधिकारी,
२९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख-(मंत्रालयीन विभागामार्फत),
३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३२) निवडनस्ती.

*पत्राने

*****

**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं-१२२०/६२/प्र.क्र.३०/का-१३अ, दिनांक : २ नोव्हेंबर, २०२२ सोबतचे विवरणपत्र**

**(अ)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: मलोआ ११२०/प्र.क्र.१५३/का-८, दिनांक २ डिसेंबर, २०२१ नुसार पाठवावयाच्या मागणीपत्रातील केवळ अ.क्र.३ बृहन्मुंबईबाहेरील पदांसाठी पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आला असून, त्यानुसार बृहन्मुंबईबाहेरील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी मागणीपत्र पाठवावे . उर्वरित माहिती शासन निर्णय, दिनांक २ डिसेंबर, २०२१ मधील मागणीपत्रानुसार पाठवावी .

**(३) : भरावयाच्या पदांचा आरक्षणनिहाय तपशील** :-

| उभे आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | महिला | प्राविण्य प्राप्त खेळाडू | माजी सैनिक | अनाथ | दिव्यांग | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त |
| (१) अनुसूचित जाती | | | | | | | | | |
| (२) अनुसूचित जमाती | | | | | | | | | |
| (३) विमुक्त जाती (अ) | | | | | | | | | |
| (४) भटक्या जमाती (ब) | | | | | | | | | |
| (५) भटक्या जमाती (क) | | | | | | | | | |
| (६) भटक्या जमाती (ड) | | | | | | | | | |
| (७) इतर मागास प्रवर्ग | | | | | | | | | |
| (८) विशेष मागास प्रवर्ग | | | | | | | | | |
| (९) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | | | | | | | | | |
| (१०) अराखीव पदे | | | | | | | | | |

**(ब)** बृहन्मुंबईतील व बृहन्मुंबईबाहेरील पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय, क्रमांक: मलोआ ११२०/प्र.क्र.१५३/ का-८, दिनांक २ डिसेंबर, २०२१ नुसार मागणीपत्र पाठविताना , मागणीपत्रात खालील अ.क्र.१५ समाविष्ट करावा.

**(१५) : पदभरती प्रक्रियेसंदर्भातील संपर्कासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याचा संपर्क तपशील**:-

| | |
|---|---|
| नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाव | |
| नियुक्ती प्राधिकाऱ्याचे पदनाम | |
| क्षेत्रिय कार्यालयाचे नाव व पत्ता | |
| भ्रमणध्वनी क्रमांक | |
| दूरध्वनी क्रमांक | |
| ईमेल आयडी | |

(श्री/श्रीमती -------------------------)

नियुक्ती प्राधिकारी /विभाग

*****